IIP: WJHSS
IIP
World Journal of Humanities and Social Sciences

**An Online Peer-Reviewed / Refereed Journal**
Vol: 01 No. Issue IV, (October-December) (2025)
Impact Factor: IIFS: 5.75
ISSN: 3107-6661 (Online)

# सामाजिक परिवर्तनात महिलांची भूमिका एक अभ्यास

**प्रा.डॉ.बाळासाहेब नानासाहेब देवकाते**
इतिहास विभाग, महात्मा फुले महाविद्यालय,पिंपरी पुणे -१७

**Article Info**

***Article History:***
Received: 15th Dec 2025
Accepted: 18th Dec 2025
Published: 20th Dec 2025

***Keywords:***

*सोलापूर*
*मांग समाज*

**ABSTRACT**

भारतीय समाज व्यवस्थेचा प्राचीन इतिहास हा मातृसत्ताक कुटुंब पद्धतीचा स्त्रीविषयीचा, आदराचा आणि सबल स्त्रीशक्तीचा सन्मान करणार आहे. कुटुंबाचे व्यवस्थापन, आर्थिक तसेच श्रमिक नियोजन आणि मानसिक व भावनिक भरणपोषण करण्याचे कार्य स्त्रियांनीच केले आहे. समाज आणि संस्कृती या एकाच नाण्याच्या दोन बाजू मानल्या जातात. त्यागपूर्ती म्हणून पुरुषापेक्षा स्त्रियांची प्रतिमा समाज आणि संस्कृती संवर्धनात अधिक उजळ व तेजोमय ठरते.

***Plagiarism Check Report:***
Date of Report: Dec 17, 2025
Similarity Index: 3%
Remarks: No significant matching text. All citations and matches are properly referenced. The manuscript is considered original.

Copyright © 2025 The Author(s). This is an open access article distributed under the Creative Commons Attribution License, (http://creativecommons.org/licenses/by/4.0/) which permits unrestricted use, distribution, and reproduction in any medium, provided the original work is properly cited.

**How to Cite:** Devkate, B. N. (2025). *सामाजिक परिवर्तनात महिलांची भूमिका : एक अभ्यास.* IIP: World Journal of Humanities and Social Sciences (IIPWJHSS), 1(IV), **597–603**.

प्रस्तावना- भारतीय समाज व्यवस्थेचा प्राचीन इतिहास हा मातृसत्ताक कुटुंब पद्धतीचा स्त्रीविषयीचा, आदराचा आणि सबल स्त्रीशक्तीचा सन्मान करणार आहे. कुटुंबाचे व्यवस्थापन, आर्थिक तसेच श्रमिक नियोजन आणि मानसिक व भावनिक भरणपोषण करण्याचे कार्य स्त्रियांनीच केले आहे. समाज आणि संस्कृती या एकाच नाण्याच्या दोन बाजू मानल्या जातात. त्यागपूर्ती म्हणून पुरुषापेक्षा स्त्रियांची प्रतिमा समाज आणि संस्कृती संवर्धनात अधिक उजळ व तेजोमय ठरते.

आज जागतिकीकरणात आणि वैज्ञानिक व आर्थिक विकासात पुरुषांच्या खांद्याला खांदा लावून तुल्यबळ असे कार्य स्त्रिया करीत आहेत, ही वाढ लक्षणीय असून स्त्रियांची प्रतिमा भारतीय लोकमानसात आता बदललेली आहे. शिव आणि शक्ती यांची शाश्वत रूपे म्हणजे पुरुष आणि प्रकृती अशी आध्यात्मिक मानली जातात.

भारताच्या इतिहासात अनेक रणरागिणीने आपल्या कार्य व कर्तृत्वाच्या जोरावर इतिहास सोनेरी पानाने लिहिला आहे. समाजपरिर्वतनाच्या कार्यात अनेकविध स्त्रियांनी आपल्या कार्याचा ठसा उमठवला आहे. भारतीय समाजात सामाजिक विषमता, धार्मिक विषमता, जातपात,स्त्रीपुरुष भेदभाव मोठ्या प्रमाणात बोकाळला होता.अंधश्रद्धेची चौकट दूर करण्याचे कार्य महिला सुधारकांनी पुढे येऊन केले.त्यामुळे समाजाला नवी दिशा मिळाली. यात अनेक स्त्रियांनी समाज परिवर्तन घडविण्यात हिरिरीने भाग घेऊन अन्याय, अत्याचार याला वाचा फोडलेली आहे.

सावित्रीबाई फुले :- भारतातील पहिल्या महिला शिक्षिका म्हणून सावित्रीबाई फुले यांना ओळखले जाते. भारतीय समाज सुधारक, शिक्षणतज्ञ व कवयित्री इत्यादी क्षेत्रात त्यांची भूमिका महत्वपूर्ण आहे. भारतीय महिलांचे अधिकार सुधारण्यासाठी महत्वाची भूमिका बजावली. स्त्रीवादाची जननी म्हणून तिच्याकडे पाहिले जाते. महात्मा फुले हे स्त्री शिक्षणाचे प्रणेते आहेत. स्त्रियांना शिक्षणाचा प्रवाहात आणण्याचे काम महात्मा फुले यांनी केले. यासाठी भिडे वाड्यात १८४८ साली मुलींची पहिली शाळा सुरू केली. मिस फेरार यांच्या शाळेतून त्यांनी प्रेरणा घेतली होती. महात्मा फुले यांनी सावित्रीबाईंना प्रथम शिक्षणाचे धडे देऊन शिक्षिका बनविले. त्याचवेळेस ख्रिश्चन मिशनऱ्यांच्या अनेक शाळा सुरू झाल्या होत्या. त्यातून प्रेरणा मिळाली होती. १८४७ साली मुंबईच्या गिरगाव परिसरात शंकर शेठ यांनी कमलाबाई हायस्कूल नावाची शाळा सुरू केली होती. ती आज दिमाखात चालू आहे. पेरीचरण सरकारने बंगाली शहरात कालीकृष्ण गर्ल्स हायस्कूल सुरू केले. मुंबईत पारसी समुदायाने मुलींसाठी शाळा उघडली होती. महात्मा फुले यांच्या बरोबर अर्धांगिनी म्हणून सावित्रीबाई फुले यांचे कर्तुत्व शोभनीय आहे.अनेक हाल अपेष्टा सोसून महात्मा फुले यांना साथ दिली. सामाजिक विषमता, अंधश्रद्धा, रूढी परंपरा, स्त्री पुरुष भेदभाव याला फाटा देऊन सामाजिक न्याय हक्कासाठी झगडल्या होत्या. विधवांची स्थिती दयनीय झाली होती. विधवांचे केशवपन थांबवण्यासाठी पुण्यात न्हाव्यांचा संप घडवून आणला होता. 'जिच्या हाती पाळण्याची दोरी ही जगाते उध्दार करी' या युक्तीप्रमाणे एक महिला शिकली तर कुटुंब शिकल्यासारखे होते. असे त्यांना वाटत होते. क्रांती सावित्रीबाई लेखिका होत्या त्यांनी मराठी भाषेत अनेक विपुल लेखन केले. त्यांनी १८५४ मध्ये काव्य फुले आणि१८९२ मध्ये बावणकाशी, सुबोध रत्नाकर प्रकाशित केले आहेत. ज्योतिबाची भाषणे संपा. नावाची कविता देखील प्रकाशित केली.त्यामध्ये वंचित लोकांना शिक्षण घेत स्वतःला मुक्त करण्यासाठी प्रोत्साहित केले. महिलांना आपल्या हक्काची जाणीव व्हावी यासाठी त्यांनी महिला सेवामंडळची स्थापना केली. भेदभाव नष्ट करण्यासाठी मेळाव्यांचे आयोजन करून एका चटईवर बसून साजरा केला जात असे. ब्राह्मण स्त्रियांना बाळंत होण्यासाठी स्वतःच्या घरात जागा उपलब्ध केली होती. भारतीय समाजात एक वेगळा आदर्श त्यांनी घालून दिला होता.नुसती महिला शिकून चालणार नाही तर तळागाळातील समाज शिकावा यासाठी म. फुले यांनी १८५१ मध्ये अस्पृश्यांसाठी शाळा उघडली एक महिला शिकली तर धर्म पुढील अशी सनातनी मंडळीची धारणा होती. याला फाटा देऊन स्त्रियांना आधार दिला. म्हणूनच विद्येचे महत्व अधोरेखित करावेसे वाटते.१

**'विद्येविना मती गेली मतीविना नीती गेली**
**नीतीविना वित्त गेले एवढे अविरत कार्य एका अविद्याने केले'**

विद्या धन किती मोठे आहे हे सांगावसं वाटते.

**पंडिता रमाबाई** :–पंडिता रमाबाई भारतीय समाज सुधारक, विदुषी, ख्रिश्चन मिशनरी म्हणून ओळखल्या जातात. त्यांनी विधवा, परित्यक्त्यांच्या उध्दारासाठी मोठे कार्य हाती घेतले होते. संस्कृतच्या त्या पंडित होत्या. पंडिता व सरस्वती ही उपाधी त्यांना मिळाली होती. अतिशय खडतर आयुष्य त्यांना जगावे लागले होते, आनंदशास्त्री डोंगरे व आनंदीबाई डोंगरे यांच्या पोटी म्हैसूर संस्थानातील कर्नाटक राज्यातील मंगलोर जवळील माहेरंगी जवळ गंगापूर डोंगरावर २३ एप्रिल १८५८ मध्ये जन्म झाला. त्यांचे वडील आनंद शास्त्री पुरोगामी विचारांचे होते. स्त्रियांना शिक्षण मिळावे या मताचे ते होते.रमाबाईचा मेधावी या कायस्थ वकिलाबरोबर प्रतिलोम पद्धतीने (आंतरजातीय) विवाह झाला. अल्पकाळातच त्यांच्या पतीचे निधन झाले. त्यांच्यावर संकटे कोसळले मन घट्ट करून त्या सामाजिक कार्याकडे वळल्या. बालविवा,विधवांच्या कल्याणासाठी संसार सोडून देवून पुण्यात आर्य महिला समाजाची स्थापना केली. त्यानंतर मिशनरी कार्यात सहभागी झाल्या. ब्राह्मणवादी व तत्कालीन पुरुषप्रधान समाजाविषयी रमाबाईंचा युक्तीवाद होता. स्त्री शिक्षण, सामाजिक समतेच्या प्रणेत्या एक उत्कृष्ट भाषातज्ञ, लेखक व बायबलचे अनुवादक होत्या. त्यांनी सारे जीवन उपेक्षित वंचित महिलांच्या सेवेसाठी खर्ची घातले. त्यांच्या कार्याची खरी सुरुवात १८८९ मध्ये मुंबई येथे 'शारदा सदन' ची स्थापना झाली. बाल विधवांना शिकण्यासाठी शाळा उघडली होती. पुण्यात निवासी समुदाय स्थापन झाल्यानंतर गरजू बेघर महिलांना निवारा व प्रेम देण्याचा प्रयत्न केला. भारताच्या महान कन्या म्हणून त्यांचा गौरव महर्षी कर्वे यांनी केला होता.

१८८२ रोजी पुण्यात आर्य महिला समाजाची स्थापना केल्यानंतर पंढरपूर, सोलापूर या ठिकाणी शाखा उघडण्यात आल्या.त्याचबरोबर ठाणे, अहमदनगर येथेही महिला समाज संस्थेच्या शाखा उघडण्यात पुढाकार घेतला. स्त्रियांमध्ये ज्ञानवृद्धी वाढावी, सन्मार्ग नीती, धर्म याचा बोध व्हावा असा आर्य समाजाचा उद्देश होता. पुण्यात हंटर साहेब भेटीसाठी आले असताना आर्य महिला समाजाच्या वतीने त्यांच्या सत्कार करण्यात आला होता. त्यावेळी आपल्या भाषणात खानेसुमारीची आकडेवारी देत ब्रिटिशांच्या वर्चस्वाखाली असलेल्या ९ कोटी ९७ लक्ष स्त्रियांपैकी फक्त ९ लाख पंच्चानव हजार एवढ्या स्त्रिया साक्षर आहेत. ही आकडेवारी देवून स्त्रियांची स्थिती मांडली. हंटर कमिशनकडे पुढील मागण्या केल्या.

१.मुलांच्या शाळेतील शिक्षकापेक्षा मुलींच्या शाळेतील शिक्षकांना ज्यादाचे वेतन द्यावे.
२. मुलींना राहण्यासाठी वस्तीगृहाची सुविधा निर्माण करावी.
३.मुलींच्या शाळा तपासणीचे काम इन्स्पेक्टर (स्त्री) मार्फत केले जावे.
४.स्त्री डॉक्टरांची उणीव भरून काढावी.
५. स्त्री शिक्षणाला प्रोत्साहन म्हणून शिष्यवृत्ती द्याव्यात.

वरील मागण्यांची दखल व्हिक्टोरिया राणीने घेऊन स्त्रियांसाठी वैद्यकीय, शिक्षण, दवाखाने निर्माण करण्याचा निर्णय घेतला. इंग्लंडच्या वास्तव्य त्यांनी ख्रिश्चन धर्माची दीक्षा घेतली, त्या अगोदर हिंदू धर्माचा त्याग केला होता. केसरी अंकात समाबाईने धर्मांतर केले हे आमचे दुर्दैव या मथळयाखाली लेख छापला होता. मुंबई, पुणे येथील वृत्तपत्रांनी ख्रिश्चन धर्म स्वीकारल्याचा निषेध केला. परंतु त्याची ख्याती देशभर पसरली. महिलांच्या अडचणी सोडवण्यात त्या कटिबद्ध होत्या. त्या हिंदू,दासप्रथा, धर्म विषयी उदास होत्या. सुबोध पत्रिका, खिस्तींधर्म हे साप्ताहिक सुरू करून ख्रिस्ती धर्माला स्वीकारला यावर लेख लिहिला. त्यात म्हणतात ईश्वराचा उपदेश म्हणून बायबल मध्ये जो भाग आहे. त्यात खरोखरच अनादी सभ पूर्णत्वास पावले आहे. ख्रिस्ताने सांगितलेला आचारलेला धर्म आपणास सर्वोत्तम व निर्दोष वाटतो. मिशनचे उपदेश हा परमेश्वरापासून आला याबद्दल माझ्या अंतरात्म्याला साक्ष देतो असे म्हटले आहे. आनंदीबाई जोशीच्या सत्कार समारंभासाठी त्या अमेरिकेला गेल्या होत्या. तेथील स्त्रियांची प्रगती, स्त्रियांचे शिक्षण, सामाजिक दर्जा पाहून त्यांचे मन प्रफुल्लित झाले. हे सर्व पाहून मदत करण्यासाठी रमाबाई असोसिएशन नावाची संस्था स्थापन केली. या संस्थेचा खर्च स्वत: उचलून दहा वर्षापर्यंत मदत देण्याचे आश्वासन दिले होते. त्यासाठी विश्वस्त मंडळची (ट्रस्ट) स्थापन केली होती. वर्षातून दोनवेळा सभा भरविल्या जात असे.

शारदा सदनातील पहिली बालविधवा मुलगी आनंदीबाई कर्वे या होत्या. पुढे हिचा विवाह धोंडो केशव कर्वे या विदुराबरोबर लावला होता.आंतरजातीय विधवा विवाहाला यातून प्रोत्साहन दिल्याचे दिसून येते.परदेशातून या संस्थेला आर्थिक मदत मिळत

असत. रमाबाई असोसिएशनचा कारभार सुरळीत चालावा यासठी सल्लागार मंडळ नेमले होते. त्यात न्या. रानडे, आर.डी.भांडारकर, के टी.तेलंग इत्यादी मंडळी नेमली होती. १८९० मध्ये शारदा सदन मुंबईहून पुण्याला हलविण्यात आले. त्यावेळी मुलींची संख्या ६४ वर पोहोचली होती. त्यात दुर्गावती किर्लोस्कर, काशीबाई देवधर, वेणूताई नामजोशी या होत्या.
( हिंगणे अनाथाश्रमात काम केलेल्या )

आर्थिक मदत समाजातील पुढार लेल्या सुधारक वर्तमानपत्रात प्रसिद्ध केली. मुलींना शिक्षणाबरोबरच बागकाम, विणकाम, छपाई, शेती इत्यादीच्या ज्ञानाचे धडे दिले जात असे. केडगाव येथे शंभर एकर जमीन घेऊन रमाबाईने शिक्षणाबरोबरच कृतीची जोड देवून अनाथ, बेघर मुलींना आपल्या सेवासदन छताखाली आणले. सामाजिक कार्याबरोबर त्यांनी साहित्य लेखनाला जवळ केले होते. १९०२ साली भारतात ( गुजरात) दुष्काळ पडला असताना दुष्काळग्रस्तांना मदत म्हणून १३५० स्त्रिया व मुले गुजरात मधून केडगावला आणली होती. ब्रिटिश सरकारने त्यांना कैसर– ए – हिंद हा किताब देवून गौरविले होते.१८८८ मध्ये 'हिंदू कास्ट' व 'हिंदू वुमेन' या नावाचे पुस्तक लिहिले. 'स्त्रियांची दुस्थिती' या ग्रंथात भारतीय स्त्रीची स्थिती मांडली आहे.बायबलचे मराठी भाषांतर रमाबाईंनी केले. ‘माझी साक्ष' हे पंडिता रमाबाईंचे आत्मचरित्र आहे.२

थोडक्यात पंडिता रमाबाई यांनी दुखी, कष्टी,अनाथ,आंधळी पांगळी बेघर महिला यांना आशेचा किरण सेवासदन माध्यमातून दिला आहे. विणकाम, भरतकाम, शेती इत्यादीचे शिक्षण देऊन स्त्रियांना आपल्या स्वतःच्या पायावर उभे केले. ख्रिस्ती धर्म स्वीकारला परंतु त्यांनी हिंदू धर्मापासून त्या लांब गेल्या नाहीत. हिंदू समाजातील स्त्रियांचा कधीच त्याग केला नाही हे आवर्जून सांगावसे वाटते. विधवांचा कैवार घेऊन त्यांच्या जगण्याला बळ दिले. रमाबाईंनी आपल्या कार्यातून जगाला ओळख करुन दिली हे आपले मोठे भाग्य म्हणावे लागेल.

**मुक्ता साळवी** :-मातंग समाजातील एक शिक्षिका आणि लेखिका म्हणून मुक्ता साळवे यांना ओळखले जाते. लहुजी वस्ताद साळवे यांच्या कुटुंबातील त्या आहेत. पहिल्या दलित विद्यार्थ्यांपैकी एक होत्या. धैर्यशील बंडखोर प्रवृत्ती त्यांची होती. मातंग समाजाच्या पूर्व इतिहास जाणून घेत असताना हा समाज पुरातन काळापासून एक राजकीय जमात होती. या समाजात थोर ऋषी,मुनी योग पुरुष व महान असे विचारवंत होऊन गेले. इ. स. १८४८ मध्ये पुण्यात महात्मा फुले यांनी शाळा सुरू केली. त्या शाळेत मुक्ता साळवे नावाची इयत्ता तिसरी मध्ये शिकत असलेली मुलगी होती. सावित्रीबाई फुले ह्या त्यांच्या शिक्षिका होत्या, तत्कालीन इंग्रज शिक्षणाधिकारी डॉ. सॅम्यूअल वर्ग तपासणी अधिकारी आले होते.त्यांच्यासमोर तिने आपला निबंध वाचून दाखविला. त्यात हिंदू धर्मातील विदारक सत्य त्यात सामावलेले होते. एवढ्या बालवयात धर्माची चिकित्सा करू शकते, यातूनच तिच्या बुध्दीची प्रगल्भता दिसून येते.

आपल्या धर्माची चिकित्सा करताना इतर धर्माचा उल्लेख ते करतात त्या धर्माचे लोक आपापल्या धर्माप्रमाणे वागवतात मात्र अस्पृश्य लोकांचा कोणता धर्म असा प्रश्न देवाला विचारतात. देवाने धर्म स्थापन केला तर आमची एवढी हीन दीन अवस्था का असा प्रश्न करतात. भगवान तुझ्याकडून आलेला कोणता धर्म तो आम्हास म्हणजे आम्ही सर्व त्याचरीतीने अनुवाद घेऊ परंतु या धर्माचा एकानेच अनुभव घ्यावा व बाकी मनुष्याच्या तोंडाला पाने पुसण्यासारखी आहेत. दुसरे धर्म पृथ्वीवरून नष्ट होतोय अशा धर्माचा अभिमान करावा असा आमच्या मनात देखील असे. ज्या धर्मात वर्णव्यवस्था आहे.अस्पृश्यांना माणूस म्हणूनही वागणूक मिळत नाही असे धर्म पृथ्वीवरून नष्ट होवोत. असा धर्माचा अभिमान करावे असा आमच्या मनात देखील न यावो’. असे विनयपणे सांगतात .पहिल्या मुद्या त्या म्हणतात देवाने माझ्या दीनदुबळ्याच्या अंतकरणात दुर्दैवी पशुपेक्षाही नीच मानलेल्या दरिद्री महार मांग च्या दुःखाविषयी कैफियत विरोधातून मांडली. त्या ज्या समाजात राहत होत्या, त्यांना सामाजिक विषमता व्यवस्थेची जाण होती. म्हणून त्यांनी लिहिले की आमची अवस्था पशु पेक्षाही हीन आहे.या निबंधाची चिकित्सा करताना असे जाणवते की, आजच्या स्वत्तंत्र भारतात तत्कालीन अस्पृश्यांची अवस्था सांप्रत काळातील मागासवर्गीयांची अवस्था खरोखरच बदल जाणवत आहे? आज तरी अनुसूचित जाती जमातील स्त्री-पुरुषांना सन्मानाची वागणूक मिळते का? मिळेत असेल तर मग आजही दलित स्त्री किंवा व्यक्तीवर अन्याय, अत्याचार का होतो? हे शोधणे काळाची गरज आहे. शिक्षणाचे आत्मभान आलेल्या मुक्ताने आपल्या ज्ञानी बांधवांना शिक्षण घेण्याचे आव्हान या निबंधातून केले आहे. ती म्हणते आहो दारिद्र्याने पिचलेल्या महार मांग

लोक हो तुम्ही रोगी आहात तर तुमच्या बुद्धीला ज्ञानरूपी औषध द्या म्हणजे तुम्ही चांगले ज्ञानी होऊन तुमच्या मनातील कु कल्पना जाऊन तुम्ही नीतीमान व्हाल. रात्रंदिवस तुमच्या ज्या जनावराप्रमाणे हजऱ्या घेतात त्या बंद होतील. तर आता झटून अभ्यास करा दलित जातीवरील गुन्हेगारीच्या शिक्याविषयी बोलणारी मुक्ता ही सर्वात पहिली स्त्री ठरते. या अस्पृश्य स्त्रियांच्या वाट्याला किती दु:ख येते याचे विदारक वास्तवाचे वर्णन करताना त्या स्त्रियांना कसे उघड्यावर बाळंत व्हावे लागते,त्यावेळी त्यांना किती यातना सहन कराव्या लागतात याचे वर्णन तिने केले आहे. बेबी कांबळे यांच्या 'जिण आमुचं' या आत्मकथनात त्यांनी बाळंतपणात अस्पृश्य स्त्रियांना कोणकोणत्या दिव्यातून जावे लागते हे मांडले आहे. दु:ख मांडताना तिला रडू येते. भगवान हे दु:ख जुलूम आहे असा प्रश्न करते. इंग्रज आल्यामुळे आम्हाला शिक्षण मिळू लागले आमच्यातील अंधकार दूर करण्याची शक्ती शिक्षणातून येऊन निबंध लिहिला.

त्याकाळात अस्पृश्यांना पाण्यालाही स्पर्श करता येत नसे. 'एकाच धर्मात एकाच देवाने निर्माण केलेल्या माणसात असा भेद का असा प्रश्न त्या मांडतात.ब्रम्हदेवाचा बाहूतून, मांडीतून, तळव्यातून मानवाची निर्मिती होते, यावर महात्मा फुले यांचा भाकड कथेवर विश्वास नव्हता. ते कृतीशील समाजसुधारक होते.वेगवेगळ्या पद्धतीने मुक्ताने विरोध केला. वेगळ्या शब्दात त्या लिहितात 'पहा एका बापापासून चार मुले झाली त्याची मालमत्ता चार मुलांना एकसारखी वाटून द्यावी असे धर्मशास्त्र सांगते परंतु एकानेच घ्यावी व बाकीच्यांनी पशुवत आपल्या बुद्धीचा व चातुर्याचा उपयोग केल्याशिवाय राहावे ही मोठी अन्यायकारक गोष्ट आहे'. निबंधातून आपल्या व्यथा लिहिल्या असून अहमदनगरच्या 'ज्ञानोदय' मिशनऱ्यांनी तो लेख छापला आहे.ही मोठी क्रांती म्हणावी लागेल. मुक्त साळवे ही मातंग समाजातील धाडसी,पराक्रमी मुलगी होती. तिने आपल्या धारदार लेखनातून समाज बांधवांना प्रबोधनाची दिशा दिली. आज तिच्या कार्याची महती समाजाला होणे आवश्यक आहे.३

**बीजमाता राईबाई सोमा पोपेरे-** भारत देश हा कृषिप्रधान देश म्हणून ओळखला जातो. ७० टक्के लोक शेतीवर अवलंबून आहेत. ३० टक्के लोक इतर व्यवसायात गुंतले आहेत. पारंपारिक पद्धतीने शेती केली जात आहे.शेतीचा कायापालट हरित क्रांतीतून म्हणूनच हरित क्रांतीचे जनक स्वामीनाथन आहेत. १९६० च्या दशका अगोदर अन्नधान्याची कमतरता पडत होती. अशावेळी बाहेरून अन्नधान्य आयात करावे लागत होते. मात्र हरित क्रांतीनंतर सर्व चित्र बदलून गेले. अधिक उत्पादन घेण्यासाठी गावातील शेतकरी संकरित हायब्रीड बेण्याकडे वळाली. देशी पारंपरिक वाण वापरण्याकडे दृश्य झाले. अशा बिकट परिस्थितीत गावरान वाण जतन करण्यासाठी राहीबाई पोपेरे या आदिवासी महिलेने उपक्रम हाती घेतला, ही कौतुकास्पद बाब आहे. अहमदनगर जिल्ह्यातील अकोले तालुक्यातील कोथालणे या छोट्याशा गावातील ही आदिवासी महिला या जगाच्या पटलावर 'सीड मदर' म्हणून ओळखली जाऊ लागली. शास्त्रज्ञ रघुनाथ माशेलकर यांनी एका कार्यक्रमात राहीबाईंचा उल्लेख **'मदर ऑफ सीड'** असा केला होता. राहीबाई या निरक्षर आदिवासी समाजातील मात्र निसर्गाच्या शाळेत खूप काही शिकल्या होत्या, हे आवर्जून सांगावसे वाटते. ही किमया वडीलापासून बालवयातच असताना मिळाली असे आवर्जून सांगतात. वडील नेहमी म्हणत असे 'जुने ते सोने' (old is Gold ) याचा अर्थ राहीबाईंनी समजावून घेऊन कृती केली. आजूबाजूच्या परिसरात पारंपरिक पद्धतीने शेतकरी देशी वाण वापरून शेती करीत असलेले आसपास दिसले.त्यावेळी राहीबाईंना अनेकांनी वेढ्यात काढले होते. सुरुवातीच्या काळात छंद म्हणून त्या करीत होत्या.

अनेकांची बोलणे तिला ऐकावे लागले होते. पण आपला धरलेला मार्ग सोडला नाही. पारंपरिक पद्धतीने बियाणं गोळा करून त्या शेतात लावत असत. 'बायफ' या संस्थेचे मार्गदर्शन व सहकार्य मिळून अनेक कार्यक्रमातून देशी बियाणांचा प्रचार व प्रसार करण्याचे कार्य सुरू झाले. यातून त्यांच्या कार्याला दिशा मिळाली. गावरान बियाणांची बँक स्थापन झाली. कळसुबाईच्या परिसरातून बियाणे गोळा केले. यातून त्यांनी त्यांच्या या धंद्याला दिशा मिळाली. गावरान बियाणांचा मोठा साठा करून **'सीड बँक'** सुरू केली. त्यांच्या बँकेत हिरवे वांगे, पांढरे वांगे, सफेद तूर, टोमॅटो, घेवडा, वाल, उडीद, हुलगा, बाजरी, गहू,नाचणी, तीळ, सूर्यफूल, जवस, नगानी,भुईमूग या प्रकारच्या रानभाज्या व नैसर्गिक पिकांचे वाण आहेत. राहीबाईने घराभोवती अडीच तीन एकर परिसरात अनेक प्रकारची चारशे पाचशे झाडे लावली ती आज उभी आहेत. त्यांचे घर म्हणजे एक प्रकारची संशोधन प्रयोगशाळा म्हटले तर वावगे ठरणार नाही. त्यांना बियाणांची नावे तोंडपाठ आहेत. त्यांचे औषधी उपयोग काय? त्यांची वैशिष्ट्ये मुखोद्गत

सांगतात. सर्व वाणांची इथंबूत माहिती देताना त्या म्हणतात देशी वाणाचे धान्य हे केवळ पावसाच्या पाण्यावर येते. या बियाणाला रासायनिक खताची व पाणी देण्याची आवश्यकता नसते. राहीबाईची सीड बँकतून राज्याच्या विविध भागात पुरवठा केला जातो. या 'बायफ' संस्थेच्या माध्यमातून बँके मार्फत हजारो गरजू शेतकऱ्यांना गावरान देशी वाणांचा पुरवठा होत आहे. त्यांच्याकडे ५३ पिकांचे आणि १४४ गावरान वाण शास्त्रशुद्ध पद्धतीने जतन करण्यात आलेली आहेत.

दुर्गम आदिवासी भागातून अत्यंत दुर्मिळ पारंपरिक गावरान वाण जतन केले आहेत. मब्रिटिश कालीन विश्रामगृहासारखे राहीबाईनी दगडी चौक आवार असलेली पारंपरिक वाड्यासारखी चिरेबंदी घर बांधलेले आहे. साबरमती आश्रमाच्या धर्तीवर दगडी चिऱ्याच्या खौमाळी, मंगलोरी, कौलारू पत्रे असलेले घर अकोले तालुक्यातील चर्चेचा विषय ठरला आहे. घर पाहण्यासाठी आजूबाजूच्या परिसरातून लोक येत असतात. पाऊस, वारा यापासून बियाणांचे संरक्षण व्हावे यासाठी पक्की बांधणी केली. बीड जिल्ह्यातून दगडी चिरे आणून बांधकाम केले आहे. तर मध्यप्रदेशातून बांधकामासाठी कारागीर आणल्याचे समजते. शेणाने सारवलेल्या भुईची बियाणांची बँक, अभ्यागत कक्ष, पुरस्कारासाठी स्वतंत्र वाचन, बियाणे प्रदर्शनाची खोली, स्वयंपाक घर, बैठक हॉल अशी रचना केली आहे.४

आज अनेक लोकांना व्याधीने ग्रासलेले आहे.शेतीमालाच्या सदोषतेमुळे माणसाला कर्करोगासारखे आजार होत आहेत. संक्रीत बियाणे किती घातक आहेत. अन्नधान्य, भाजीपाला ना देशी असतात. सेंद्रिय पद्धतीचा उपयोग करून पिकवला जावा मात्र तसे होत नाही. शेतकरी अमाप भरमसाठ पीक काढण्यासाठी रासायनिक खतांचा फवारणी चा वापर करून अधिक पैसा मिळवण्याचा मागे लागला आहे.माणसाचे जीवन धोक्यात आले आहे.मनुष्याचे जीवन क्षणभंगुर आहे. जीवनशैली अनादी सुखी होण्यासाठी चांगले सकस आहार घेणे आज काळाची गरज भासते मात्र तसे होत नाही.

भारताच्या राष्ट्रपतींनी २०१८ मध्ये नारीशक्ती पुरस्कार देवून रहिबाईला गौरविले होते.पुन्हा २०२० भारत सरकारने पद्मश्री किताब देवून राहीबाईंना सन्मानित केले होते तर महाराष्ट्र सरकारने प्रजासत्ताकाचे औचित्य साधून **'मदर ऑफ सीड्स'** हा किताब देवून गौरविले. एक निरक्षर महिला काय करू शकते हे जगाला आपली ओळख करून दिली आहे ही मोठी भूषणावह गोष्ट म्हणावी लागेल.

सारांश- भारताच्या इतिहासात सामाजिक परिवर्तनामध्ये महिलांचे योगदान महत्त्वपूर्ण आहे. अनेकविध महिला कर्तृत्ववान स्त्रियांनी सामाजिक, धार्मिक, आर्थिक परिस्थितीला तोंड द्यावे लागले.एकोणीसाव्या शतकात भारतात मोठ्याप्रमाणात सामाजिक विषमतेची दरी होती. स्त्री पुरुष भेदभाव, अंधश्रद्धा, रूढी परंपरा बुरसटलेल्या गोष्टींना फाटा देण्याचे काम कर्तुत्वान महिलाना करावे लागले आणि त्यांनी स्वीकारून समाज परिवर्तन घडवून आणले. महिलांचे मोठे यश म्हणावे लागेल.प्राचीन काळापासून ते आजच्या आधुनिक काळापर्यंतच्या इतिहास जाणून घेतला तर अनेक महिलांनी आपल्या कर्तुत्वाने इतिहासात ठसा उमठविला आहे. लोकमुद्रा, अत्रेय,मातोश्री जिजाबाई,पुण्यश्लोक आहिल्यादेवी, सावित्रीबाई फुले,मुक्ता साळवे,पंडिता रमाबाई, ताराबाई शिंदे, रखमाबाई सावे, सुधा मुर्ती,राहीबाई इत्यादी कर्तुत्वान स्त्रियांनी भारतीय समाजातील सामाजिक,धार्मिक,आर्थिक,स्त्री पुरुष भेद नष्ट करण्यासाठी व अनाथ महिलांना आधार देण्यासाठी सारे आयुष्य खर्ची घातले.

अनाथ,पददलित, विधवा स्त्रियांना आधार देऊन त्यांना सन्मानाने जगण्यास बळ दिले. या कर्तुत्वान महिलांनी भारतीय समाज परिवर्तनाच्या इतिहासात महत्त्वाची भूमिका बजावली हे अधोरेखित करावे लागेल यात शंका नाही.

संदर्भसूची :-

१ मा.गो.माळी,सावित्रीबाई फुले समग्रवाड्मय, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ मुंबई २००६

२ हरी नरके, महाराष्ट्र टाइम्स पुणे,ऑगस्ट २०१४

३ तानाजी ठोंबरे,महात्मा फुले यांचे शैक्षणिक कार्य, लोकवाङ्मयगृह मुंबई मार्च १९९१

४ पंडिता रमाबाई,माझी साक्ष,अनुवाद रेव्हआर जोशी,रमाबाई मुक्तीमिशन केडगाव प्र.आ.१९०७, पुर्नमुद्रण१९६८

५ अनिल कठारे, महाराष्ट्रातील समाज सुधारक, चैतन्य प्रकाशन नागपूर

५ साहेबराव गाठाळ, आधुनिक भारताचा इतिहास, कैलास पब्लिकेशन औरंगाबाद.

६ चंद्रकांत वानखेडे,मुक्ता साळवे, अस्मिता प्रकाशन अहमदनगर
७ विलास खोले,स्त्री पुरुष तुलना,
८ Esakal.Com/Maharashtra/agabairahibaipopretraity2060021
९ www.rahibaipopre.com.
१० काळ्या मातीचे देणे, महाराष्ट्र टाइम्स २५ मार्च २०२४